धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर विरोधकांची सरकारवर बोचरी टीका >> पान 2

पंढरपूर कॉरिडॉरचे काम कोणावरही अन्याय न करता योग्य पुनर्वसन करून पूर्ण करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >> पान 3

विद्यार्थी शक्तीचा विजय! जंतर-मंतरवर आमदार सिद्धार्थ खरातांनी अभिजीत दिपके यांचे अभिनंदन >> पान 4

**सुविचार**

उत्साही असावे पण उतावीळ होऊ नये.
कृतज्ञ असावे पण कृतघ्न नसावे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




आसाममधील पूरपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अभिनेत्री पेडणेकरनं मदतीचं केलं आवाहन

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 11 ■ रविवार, दि. 26 जुलै 2026 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा अखेर राजीनामा

**दैनिक आपला विदर्भ**

**नवी दिल्ली/वृत्तससंथा** : नीट परीक्षा पेपर फुटीच्या प्रकरणावरून गेल्या एका महिन्यापासून दिल्लीत कॉक्रोच जनता पार्टीचं आंदोलन सुरू आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी कॉक्रोच जनता पार्टीकडून करण्यात आली होती. याच मुद्यावरून पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक हे देखील बेमुदत उपोषणाला बसले होते. मात्र, २३ जुलै रोजी सोनम वांगचुक यांनी त्यांचं उपोषण सोडलं. सोनम वांगचुक यांनी उपोषण सोडल्यानंतरही कॉक्रोच जनता पार्टीचं आंदोलन सुरूच राहणार असल्याची घोषणा अभिजीत दीपके यांनी केली होती.

कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला देशभरातून मोठा पाठिंबा मिळत होता. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉक्रोच जनता पार्टी आणि विद्यार्थी ठाम होते. कॉक्रोच जनता पार्टीच्या या आंदोलनाला विरोधकांनी देखील पाठिंबा देत केंद्र सरकारवर टीकेची झोड उठवली होती. या सर्व घडामोडीनंतर आता दिल्लीतून एक मोठी बातमी समोर आली आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी अखेर आज (२५ जुलै) शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा दिला आहे. या संदर्भातील वृत्त एएनआयने दिलं आहे.

## धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर अभिजीत दीपकेंची पहिली प्रतिक्रिया



गेल्या ३६ दिवसांपासून दिल्लीत जंतर मंतरवर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलन करणाऱ्या कॉक्रोच जनता पार्टीच्या मागणीला यश आलं असून धर्मेंद्र प्रधान शिक्षणमंत्री पदावरुन पायउतार झाले आहेत. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपकेंनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. आपण करुन दाखवलं, असं म्हणत दीपके आणि आंदोलकांनी जंतर मंतरवर जल्लोष केला. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आहे. हे काय म्हणत होते की, या सरकारमध्ये राजीनामे होत नाहीत, अशी प्रतिक्रिया दीपकेंनी दिली.

**कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला मोठं यश**

गेल्या एका महिन्यांपासून सुरू असलेल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला अखेर मोठं यश आलं आहे. आज (२५ जुलै) केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला मोठं यश आल्याचं बोललं जात आहे. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर दिल्लीतील जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांनी मोठा जल्लोष केल्याचं पाहायला मिळत आहे.

**तर मोदींची खुर्ची धोक्यात येईल, अभिजीत दीपकेंनी काय इशारा दिला होता?**

कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला देशभरातून मोठा पाठिंबा मिळत असल्याचं पाहायला मिळालं. कॉक्रोच जनता पार्टीच्या मागण्याच्या पार्श्र्वभूमीवर २४ जुलै रोजी कॉक्रोच जनता पार्टीचं शिष्टमंडळ आणि केंद्रीय मंत्री जे.पी.नड्डा आणि मंत्री जितेंद्र सिंह यांच्यात जवळपास २ तास बैठक



झाली होती. या बैठकीत कॉक्रोच जनता पार्टीच्या शिष्टमंडळाकडून विद्यार्थ्यांच्या मागण्या सरकारसमोर मांडण्यात आल्या होत्या. याच बैठकीत विद्यार्थ्यांच्या मागण्याबाबत सरकार सकारात्मक असल्याची माहिती कॉक्रोच जनता पार्टीच्या नेत्यांनी दिली होती. या बैठकीत काय घडलं? याची माहिती सांगताना अभिजीत दीपके यांनी थेट पंतप्रधान मोदींना इशारा दिला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना माझं आवाहन आहे की तुम्ही धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्या, जर धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा तुम्ही घेतला नाही, तर उद्या तुमची खुर्ची धोक्यात येईल, असा इशारा अभिजीत दीपके यांनी दिला होता.

## शिक्षणमंत्रिपदाची जबाबदारी मिळताच प्रल्हाद जोशी यांची पहिली प्रतिक्रिया

**दैनिक आपला विदर्भ**

**नवी दिल्ली/वृत्तससंथा** : धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर, आता भाजपचे ज्येष्ठ नेते तथा केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्याकडे शिक्षण मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. यानंतर, भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दाखवलेल्या विश्र्वासाबद्दल त्यांचे आभार मानत, शिक्षण मंत्रालयाची ही महत्त्वाची जबाबदारी आपण संपूर्ण क्षमतेने आणि निष्ठेने पार पाडू, असे जोशी यांनी म्हटले आहे.

**काय म्हणाले प्रल्हाद जोशी?**

सध्या प्रल्हाद जोशी यांच्याकडे, केंद्र सरकारमध्ये, ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण तसेच ठशपशुरलश्रश एपशीसू मंत्रालयाचा कार्यभार आहे. आता त्यांच्याकडे शिक्षण मंत्रालयाचाही अतिरिक्त प्रभार देण्यात आला आहे. या निर्णयासंदर्भात बोलताना ते म्हणाले, मी अत्यंत कर्तव्यभावनेने आणि नम्रतेने ही जबाबदारी स्वीकारत आहे. यासाठी मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा अत्यंत आभारी आहे. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने गेल्या १२ वर्षांत अनेक ऐतिहासिक यश संपादन केले गेले आहे.

दरम्यान, प्रल्हाद जोशी यांनी माजी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या योगदानाचेही कौतुक केले. ते म्हणाले, गेल्या चार-पाच वर्षांत धर्मेंद्र प्रधान यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरण प्रभावीपणे लागू केले. याच बरोबर, अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवले. देशाने नव्या शिक्षण पद्धतीत मोठी आणि उल्लेखनीय प्रगती केली आहे. आता पंतप्रधानांच्या मार्गदर्शनाखाली मी माझ्या संपूर्ण क्षमतेने काम करेन आणि ही जबाबदारी निष्ठेने पार पाडेन.

### कोण आहेत प्रल्हाद जोशी?



प्रल्हाद जोशी हे कर्नाटकच्या धारवाड मतदारसंघातून सलग पाच वेळा खासदार म्हणून निवडून आलेले आहेत. त्यांच्याकडे सध्या ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाची जबाबदारी आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पार्श्र्वभूमी असलेले प्रल्हाद जोशी हे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रिय गृहमंत्री अमित शाह यांच्या अत्यंत जवळचे मानले जातात. आता ते आपल्याकडी खात्यांबरोबरच, देशाच्या शिक्षण मंत्रालयाच्या महत्त्वाच्या धोरणात्मक निर्णयांवरही लक्ष ठेवतील.

## अभिजीत दिपके यांच्या आंदोलनाला मोठे यश; आई-वडिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू



**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी** : विद्यार्थी प्रश्नांवर आवाज उठवत सुरू केलेल्या आंदोलनाला अखेर मोठे यश मिळाल्यानंतर अभिजीत दिपके यांच्या कुटुंबात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर दिपके यांच्या घरी जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले. या क्षणी त्यांच्या आई-वडिलांसह संपूर्ण कुटुंबीयांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.

अभिजीत दिपके यांच्या आईंनी भावना व्यक्त करताना सांगितले, मुलाने उभे केलेल्या आंदोलनाला मोठे यश मिळाले, याचा आम्हाला अभिमान आहे. हे त्याचे पहिलेच आंदोलन होते. आंदोलनादरम्यान त्याच्यावर शाई फेकण्यात आली, चापटही मारण्यात आली. अनेक संकटांचा सामना करत त्याने रात्रभर मच्छरांच्या त्रासात आंदोलन सुरू ठेवले. मात्र त्याने हार मानली नाही. अखेर त्याच्या संघर्षाला यश मिळाले आणि आजचा दिवस आमच्यासाठी अत्यंत आनंदाचा आहे. दिपके यांच्या आंदोलनाला यश मिळाल्याची बातमी समोर आल्यानंतर त्यांच्या समर्थकांनीही आनंद व्यक्त केला. कुटुंबीयांनी एकमेकांना मिठी मारत आनंद साजरा केला. संघर्ष, चिकाटी आणि जिद्दीच्या बळावर आंदोलनाला मिळालेल्या यशामुळे दिपके कुटुंबासाठी हा क्षण भावनिक आणि अविस्मरणीय ठरला.

## अभिजित दिपके यांच्या जिवाला धोका?

### दिल्ली पोलिसांवर विश्वास नाही, महाराष्ट्र पोलिसांची सुरक्षा देण्यासाठी बहिणीचे राष्ट्रपतींना निवेदन

**दैनिक आपला विदर्भ**

**बीड । प्रतिनिधी** : दिल्ली येथील जंतरमंतर वर चे संस्थापक अध्यक्ष अभिजित दिपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे आंदोलन आणि उपोषण सुरू आहे. दिल्ली पोलिसांकडून आंदोलन कर्त्यांवर झालेला भ्याड लाठी हल्ला पाहता अभिजित दिपके यांच्याही जिवाला धोका असल्याची शक्यता दिपके यांची बहीण स्नेहा जितिन वंजारे यांनी वर्तवली आहे. दिल्ली पोलिसांवर आमचा विश्वास नाही त्यामुळे महाराष्ट्र पोलिसांची विशेष सुरक्षा प्रदान करावी अशा मागणीचं निवेदन बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींकडे पाठवण्यात आलं आहे. दिपके यांच्या कुटुंबाचा त्यांच्याशी अद्याप संपर्क झाला नाही, त्यामुळे आम्हाला भीती वाटत आहे असंही निवेदनात नमूद करण्यात आलं आहे.

दिल्लीमध्ये आता मात्र आनंदाचं



वातावरण आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर जंतर मंतरवर आंदोलकांनी जल्लोष केला. तिथे पोलिसांचाही मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. आनंदाच्या भरात विद्यार्थी आणि आंदोलक काही विपरीत करू नयेत यासाठी हा संपूर्ण बंदोबस्त करण्यात आला आहे.

दुसरीकडे धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर इतर दोन मागण्या आणि संबंधित चर्चेसाठी कॉक्रोच जनता पार्टीचे प्रवक्ते दास आणि केंद्रीय मत्री जे पी नड्डा तसंच जितेंद्र सिंह कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये एकत्र बैठक घेत आहेत. त्याचवेळी कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी सांगितलं की, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा हे सिद्ध करतो की, जर तुम्ही ठाम राहिलात आणि भाजपाच्या नेतृत्वाखालील सरकारसमोर झुकण्यास नकार दिलात, तर तुम्ही कोणाचाही राजीनामा मिळवू शकता.

आंदोलकांच्या सततच्या मागणीपुढे अखेर सरकारने माघार घेतल्यामुळे प्रधान यांनी आपल्या राजीनाम्याची घोषणा केली आहे. ‘‘आम्ही हे करून दाखवले आहे. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आहे,‘‘ असं चे संस्थापक अभिजित दिपके यांनी म्हटलंय.

## मोदींच्या विरोधात त्यांच्यात पक्षात अस्वस्थता याचा फायदा त्या लोकांनी घेतला असावा – शरद पवार

**पुणे । प्रतिनिधी :** नीट पेपरफुटी प्रकरणात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, या मागणीसाठी विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरू असताना आज त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. यावर प्रतिक्रिया देताना राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार म्हणाले, हा देशातील युवाशक्तीच्या एकजुटीचा मोठा विजय आहे.



पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना शरद पवार म्हणाले की, नीट पेपरफुटी प्रकरणी दिल्लीतील जंतर-मंतर येथे सलग २८ दिवस विद्यार्थ्यांनी दिलेला लढा आणि दाखवलेली जिद्द वाखाणण्याजोगी आहे. आंदोलकांच्या आग्रही मागणीनुसार अखेर केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिला. दडपशाहीला न घाबरता अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहून सरकारला नैतिक जबाबदारी स्वीकारण्यास भाग पाडणारा हा लढा लोकशाहीच्या ताकदीचे प्रतीक आहे. हा देशातील युवाशक्तीच्या एकजुटीचा मोठा विजय आहे. तसंच, विरोधी पक्षातील प्रमुख नेत्यांनी युवकांना नैतिक आणि संसदीय पाठबळ दिल्याबद्दल सर्व विरोधी पक्षांच्या खासदारांचे त्यांनी आभार मानले. देशातील लोकशाहीनं नव्याने कात टाकली असून, त्याचं श्रेय देशातील युवा पिढीला जातं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्याबाबत विचारलं असता शरद पवार म्हणाले, ‘‘मी पंतप्रधानांना लोकशाहीत संवादाचं महत्त्व पटवून दिलं. विद्यार्थ्यांशी संवाद साधणं आवश्यक आहे आणि त्यांच्या मागण्यांवर गांभीर्यानं विचार व्हावा आणि राजीनामा घेतला पाहिजे, असं सांगितलं. सरकार संवादासाठी तयार असेल तर चर्चा व्हावी, असं मी अभिजित दिपके यांनाही सांगितलं होतं. विद्यार्थ्यांचा आग्रह पंतप्रधान आणि शिक्षणमंत्र्यांनी मान्य केला आणि आज शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिला. हे नव्या पिढीच्या सामूहिक लढ्याचं यश असून मी त्याचं अभिनंदन करतो.






## धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्याने लढा थांबणार नाही, धर्मेंद्र प्रधानांसह रॅकेटमधील सर्वांना कठोर शिक्षा करा: सपकाळ

### नीट प्रकरणी संसदेत चर्चा, विद्यार्थ्यांवरील गुन्हे रद्द करणे व पंतप्रधानांनी माफी मागेपर्यंत काँग्रेसचा लढा सुरुच राहणा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** नीट पेपर फुटीप्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला असला तरी अद्याप हा लढा संपलेला नाही, मोदी सरकारच्या शिक्षण विभागातील भ्रष्ट कारभाराविरोधातील काँग्रेस पक्षाचा लढा सुरुच राहणार आहे.



नीट पेपरफुटी प्रकरणी धर्मेंद्र प्रधान यांना व या रॅकेट मधील सर्वांना कठोर शिक्षा झाली पाहिजे, संसदेत यावर चर्चा झाली पाहिजे, विद्यार्थ्यांवरील सर्व गुन्हे रद्द केले पाहिजेत आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची जाहीर माफी मागितल्याशिवाय काँग्रेस गप्प बसणार नाही, असा इशारा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे.

यासंदर्भात प्रतिक्रिया देताना हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, धर्मेंद्र प्रधान यांना अखेर राजीनामा द्यावाच लागला पण या राजीनाम्याने हुरुळून जाण्याची गरज नाही. धर्मेंद्र प्रधान यांच्या काळात त्यांनी परिक्षा पद्धतीवर पकड निर्माण करून वन नेशन, वन एक्झामिनेशनच्या माध्यमातून १५२ वेळा पेपर लिक केला, एका वर्ग विशेषाला व भाजपाच्या लोकांना फायदा पोहचवण्यात आला व यातून भ्रष्ट मार्गाने पैसे कमवण्यात आले.

नीट परिक्षेसाठी पालक जेवढा पैसा खर्च करतात तो केंद्र सरकारच्या पाच विभागातील खर्चापेक्षा जास्त आहे. या रॅकेटची पाळंमुळं खोलपर्यंत गेलेली आहेत. या सर्वांचा शोध लागल्याशिवाय शांत बसता येणार नाही. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने काँग्रेस पक्षाने सुरु केलेले आंदोलन थांबणार नाही, कँडल मार्चही होणार आहे, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी स्पष्ट केले.

## रस्त्यावरच्या संघर्षाची ताकद पुन्हा सिद्ध झाली,जंतर-मंतरवरील विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर रविकांत तुपकरांची आक्रमक प्रतिक्रिया

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा । प्रतिनिधी :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनानंतर शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी आक्रमक प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. देशातील तरुणाईने पुन्हा एकदा रस्त्यावरच्या संघर्षाची ताकद सिद्ध केली असून, विद्यार्थ्यांच्या एकजुटीमुळे सरकारला त्यांच्या मागण्यांवर चर्चा करून निर्णय घ्यावा लागल्याचे त्यांनी सांगितले.

तुपकर म्हणाले की, अभिजीत दीपके यांनी दिलेल्या आंदोलनाच्या हाकेला देशभरातील विद्यार्थ्यांनी आणि तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. हा विजय कोणत्याही एका व्यक्तीचा नसून संघर्ष करणाऱ्या तरुणांच्या एकजुटीचा आणि लोकशाही मार्गाने उभारलेल्या आंदोलनाचा आहे.



ते पुढे म्हणाले की, सरकारकडून अन्याय होत असेल तर समाजातील प्रत्येक घटकाने शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने रस्त्यावर उतरून आवाज उठवला पाहिजे. सत्तेपेक्षा जनआंदोलनाची ताकद मोठी असते, हे या आंदोलनातून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

लढणाऱ्या प्रत्येक तरुणाला सलाम करत तुपकर यांनी संघर्षाची ही लढाई पुढेही सुरू राहील, असा विश्वास व्यक्त केला.

## शौर्य, बलिदान आणि भारताच्या विजयाचा सुवर्ण अध्याय

२६ जुलै १९९९ हा दिवस भारतीय इतिहासातील अभिमानाचा दिवस आहे. याच दिवशी भारतीय सैन्याने 'ऑपरेशन विजय' यशस्वीरीत्या पूर्ण करून कारगिलच्या दुर्गम पर्वतरांगांमधून पाकिस्तानी घुसखोरांना हुसकावून लावत ऐतिहासिक विजय मिळवला. म्हणूनच दरवर्षी २६ जुलै हा दिवस 'कारगिल विजय दिवस' म्हणून साजरा केला जातो. कारगिल हा लडाखमधील अत्यंत दुर्गम आणि सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा प्रदेश आहे. श्रीनगरपासून सुमारे २०५ किलोमीटर अंतरावर असलेल्या या भागात हिवाळ्यात प्रचंड हिमवृष्टी होते. तापमान उणे ५० ते ६० अंश सेल्सिअसपर्यंत घसरते आणि अनेक लष्करी चौक्या बर्फाखाली जातात. भारत-पाकिस्तानमधील सिमला करारानुसार काही उंच चौक्या हिवाळ्यात रिकाम्या करण्यात येत असत. याच परिस्थितीचा फायदा घेत पाकिस्तानने १९९९ च्या हिवाळ्यात गुप्तपणे भारतीय हद्दीत घुसखोरी केली. मे महिन्याच्या सुरुवातीला स्थानिक मेंढपाळांनी भारतीय सैन्याला संशयास्पद हालचालींची माहिती दिली. त्यानंतर भारतीय सैन्याने टेहळणी केली असता मोठ्या प्रमाणावर पाकिस्तानी सैनिकांनी भारतीय चौक्यांवर कब्जा केल्याचे स्पष्ट झाले. या घुसखोरीची माहिती वेळेवर मिळू न शकल्यामुळे भारतीय गुप्तचर यंत्रणांवरही मोठ्या प्रमाणावर टीका झाली. या आव्हानाला उत्तर देण्यासाठी भारताने 'ऑपरेशन विजय' सुरू केले. २६ मे १९९९ पासून भारतीय सैन्य आणि हवाई दलाने संयुक्त कारवाईला सुरुवात केली. उंच पर्वतांवर बसलेल्या शत्रूवर खालील बाजूने चढाई करणे हे अत्यंत कठीण आणि धोकादायक काम होते. रात्रीच्या अंधारात, गोठवणाऱ्या थंडीत आणि शत्रूच्या गोळीबाराचा सामना करत भारतीय जवानांनी अतुलनीय शौर्य दाखवले. तोलोलिंग आणि टायगर हिल या लढाया कारगिल युद्धातील सर्वात निर्णायक ठरल्या. ४ जुलै १९९९ रोजी टायगर हिलवर पुन्हा तिरंगा फडकला आणि त्यानंतर युद्धाचे पारडे पूर्णपणे भारताच्या बाजूने झुकले. भारतीय सैन्याने बोफोर्स तोफांचा प्रभावी वापर करून शत्रूच्या बंकरांचा अचूक वेध घेतला. कारगिल युद्धात भारतीय हवाई दलानेही अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. समुद्रसपाटीपासून १६,००० ते १८,००० फूट उंचीवर उड्डाण करणे हे मोठे आव्हान होते. अशा प्रतिकूल परिस्थितीत मिग-२७, मिग-२९ आणि मिराज-२००० विमानांनी अचूक हल्ले करून भारतीय सैन्याला मोठी मदत केली. सुमारे ७७ दिवस चाललेल्या या युद्धात जवळपास ३० हजार भारतीय सैनिकांनी सहभाग घेतला. या संघर्षात ५२७ भारतीय जवान शहीद झाले, तर १,३०० हून अधिक जवान जखमी झाले. त्यांच्या अद्वितीय शौर्यामुळे भारताने प्रत्येक इंच भूभाग पुन्हा ताब्यात घेतला. कारगिल युद्ध हे केवळ लष्करी विजय नव्हते, तर भारताच्या संयम, मुत्सद्देगिरी आणि नैतिक भूमिकेचाही विजय होता. भारताने नियंत्रण रेषा ओलांडली नाही आणि युद्ध कारगिल परिसरापुरतेच मर्यादित ठेवले. त्यामुळे आंतरराष्ट्रीय समुदायाने भारताच्या संयमी भूमिकेचे कौतुक केले, तर पाकिस्तानवर जगभरातून टीका झाली. अखेर पाकिस्तानला आपले सैन्य माघारी घ्यावे लागले. कारगिल युद्धानंतर पाकिस्तानचे काही माजी लष्करी अधिकारी आणि विश्लेषकांनीही हे मान्य केले की या मोहिमेत पाकिस्तानच्या नियमित सैन्याचाच सहभाग होता. या युद्धामुळे पाकिस्तानला लष्करी, राजनैतिक आणि नैतिक अशा तिन्ही स्तरांवर मोठा फटका बसला. कारगिल युद्ध भारतीय लोकसभा बरखास्त असताना झाले होते. तरीही सत्ताधारी आणि विरोधी पक्षांनी राष्ट्रीय सुरक्षेच्या प्रश्नावर एकजूट दाखवून भारतीय लोकशाहीची परिपक्वता जगासमोर सिद्ध केली. कारगिल विजय दिवस हा केवळ विजयाचा उत्सव नाही, तर मातृभूमीसाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या वीर जवानांच्या शौर्याला आणि त्यागाला कृतज्ञतेने वंदन करण्याचा दिवस आहे. त्यांचे बलिदान प्रत्येक भारतीयाला राष्ट्रप्रेम, कर्तव्यनिष्ठा आणि देशासाठी सर्वस्व अर्पण करण्याची प्रेरणा देत राहील. कारगिलच्या रणांगणावर मातृभूमीसाठी प्राणांची आहुती देणाऱ्या सर्व वीर जवानांना कोटी कोटी प्रणाम!

# धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर विरोधकांची सरकारवर बोचरी टीका





**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी अखेर आज राजीनामा दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उद्देशून लिहिलेल्या राजीनामा पत्रात, धर्में द्र प्रधान यांनी शिक्षण आणि देशातील युवाशक्तीप्रती असलेल्या आपल्या आजीवन कटिबद्धतेवर भर दिला. प्रधान लिहितात, ''गेल्या चार दशकांहून अधिक काळ मी विद्यार्थी, शिक्षक आणि शैक्षणिक सुधारणांसाठी स्वतःला समर्पित केलं आहे; एक मजबूत, सर्वसमावेशक आणि दूरदर्शी शिक्षण व्यवस्था हाच एका समर्थ राष्ट्राचा पाया असतो, यावर माझा सदैव विश्वास राहिला आहे.

नीट-यूजी परीक्षेतील अनियमिततेचा उल्लेख करत ते म्हणाले, ''सरकारने तत्परतेनं पावलं उचलली; या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवला, परीक्षा रद्द केली आणि संगणक-आधारित पद्धतीद्वारे पुन्हा परीक्षा घेण्याची घोषणा केली. २० लाखांहून अधिक विद्यार्थ्यांसाठी निष्पक्ष प्रक्रिया सुनिश्चित करणे हेच आमचं सर्वोच्च प्राधान्य होतं.

प्रधान यांनी सांगितलं की, त्यांनी कधीही जबाबदारीपासून पळ काढला नाही. ते पुढे म्हणतात, ''आम्ही परीक्षा माफियाला कोणत्याही विद्यार्थ्याचे भविष्य उद्ध्वस्त करू देणार नाही.'' विद्यार्थ्यांना दिशाभूल करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांबद्दल खंत व्यक्त करत ते पुढे म्हणाले, ''सध्याच्या परिस्थितीचा गैरफायदा देशविरोधी शक्तींनी घेऊ नये आणि देशातील तरुणांचे हित जपावे, यासाठी मी माझा राजीनामा सादर केला आहे.

### राज ठाकरे यांनी आंदोलक तरुणांचं केलं अभिनंदन

मनसे नेते राज ठाकरे यांनी एक्सवर पोस्ट करुन आंदोलक तरुणांचं अभिनंद केलं आहे. ते आपल्या एक्स हँडलवरील पोस्टमध्ये म्हणतात, ''सर्व तरुण मुला-मुलींचे मनःपूर्वक अभिनंदन. तुमच्या जिद्दीमुळेच या मनमानी कारभार करणाऱ्या सरकारला अखेर माघार घ्यावी लागली. गेल्या ३६ दिवसांत तुम्ही आणि तुमच्या पालकांनी जे काही सोसले आहे, त्याची कल्पना करणेही कठीण आहे. या संपूर्ण संघर्षात महाराष्ट्र नवनिर्माण सेना तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिली आणि यापुढेही राहील. कष्टाने मिळवलेला हा विजय साजरा करण्यासाठी, नियोजित केल्याप्रमाणे आपण उद्या सकाळी १०:०० वाजता वीर सावरकर मार्ग, शिवाजी पार्क येथे एकत्र येऊया. आपल्या कुटुंबीयांना सोबत घेऊन या आणि या ऐतिहासिक यशाचा आनंद साजरा करण्यात आमच्यासोबत सहभागी व्हा. हा विजय तुमचा आहे.''

### नवीन शैक्षणिक धोरणातील प्रमुख तरतुदी रद्द केल्या पाहिजेत : सीपीआय (एम) नेते चौधरी बाबू राव

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या पार्श्वभूमीवर, सीपीआय (एम) नेते सीएच बाबू राव यांनी म्हटलं आहे की, नवीन शैक्षणिक धोरणातील प्रमुख तरतुदी रद्द केल्या पाहिजेत. ''नवीन शैक्षणिक धोरणामुळेच शिक्षण व्यवस्थेचे केंद्रीकरण, व्यापारीकरण आणि सांप्रदायिकीकरण झाले आहे, जे धोकादायक आहे. त्यामुळे, ही मागणी कायम राहिली पाहिजे. नॅशनल टेस्टिंग एजन्सी () बरखास्त केली पाहिजे,'' असं सांगत त्यांनी परीक्षा व्यवस्थेच्या विकेंद्रीकरणाची अत्यंत गरज असल्याचं नमूद केलं. ''ही मागणी कायम राहिली पाहिजे आणि विद्यार्थ्यांनी केंद्र सरकारवर दबाव टाकणे सुरू ठेवले पाहिजे.'' असंही ते म्हणाले.



### कोणताही प्रश्न हिंसा किंवा चुकीच्या मार्गाने नव्हे, तर संवादाच्या माध्यमातूनच सोडवला जाऊ शकतो – अण्णा हजारे

अहिल्यानगर – केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी प्रतिक्रिया देताना कोणताही प्रश्न हिंसा किंवा चुकीच्या मार्गाने नव्हे, तर संवादाच्या माध्यमातूनच सोडवला जाऊ शकतो, असं स्पष्ट मत व्यक्त केलं. अहिल्यानगर येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना अण्णा हजारे म्हणाले, ''कुठलेही प्रश्न संवादाने सुटतात. चुकीच्या मार्गाने जाऊन प्रश्न कधीच सुटत नाहीत. माझी आजपर्यंत २२ उपोषणे झाली. मात्र मी कधीही हिंसेचा मार्ग स्वीकारला नाही. शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने आंदोलन केल्यास त्याचे सकारात्मक परिणाम होतात.'' असं ते म्हणाले.

### धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर ऐतिहासिक विजयाबद्दल शिक्षक संघटनेकडून विद्यार्थी आणि तरुणांचे अभिनंदन

शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर, ऐतिहासिक विजयासाठी विद्यार्थी आणि तरुणांनी दिलेल्या लढ्याचे जवाहरलाल नेहरू विद्यापीठ शिक्षक संघटनेने शनिवारी अभिनंदन केले. याबाबत जारी केलेल्या एका प्रसिद्धीपत्रकात ने म्हटलं आहे की, विद्यार्थ्यांनी ''आपल्या एकजुटीच्या आणि दृढ निश्चयाच्या जोरावर हे यश मिळवलं आहे; तसंच पोलीस बळाचा वापर करून, दहशत निर्माण करून हा लढा दडपण्याचे प्रयत्न आणि या लढ्याला राष्ट्रविरोधी, परकीय शक्तींचे कारस्थान ठरवून बदनाम करण्याच्या नेहमीच्या पद्धती या सर्वांचा त्यांनी यशस्वीपणे सामना केला.'' ''या लढ्याचे केंद्र देशाची राजधानी असलेल्या जंतर-मंतर येथे असले तरी, त्याचे स्वरूप देशभर पसरलेले होते. याच शक्तीने सरकारला माघार घेण्यास आणि सरकारच्या शिक्षण धोरणांमुळे होणाऱ्या हानीची जबाबदारी स्वीकारण्यास भाग पाडले.'' शिक्षक संघटनेने शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याला ''भारतीय लोकशाहीचा मोठा विजय'' असे संबोधले. तसंच, ''भारतीय शिक्षणाचा ऱ्हास रोखण्यासाठी आणि शिक्षण व्यवस्था राष्ट्र, समाजाच्या प्रगतीसाठी उपयुक्त ठरेल याची खात्री करण्यासाठी चाललेल्या लढ्याला हा विजय पुढील वाटचालीसाठी प्रेरणा देईल, असंही संघटनेनं म्हटलं आहे.

### सीजेपी ने लिहिली सोनम वांगचुक यांचे आभार मानणारी पोस्ट

ने लिहिले की, सोनम वांगचुक यांच्या गांधीवादी सत्याग्रहाने संपूर्ण देशाला जागे केले. २६ दिवसांचे उपवास हे देशातील तरुणांसाठी एक पवित्र आणि महान बलिदान होते. एक नैतिक शक्ती म्हणून ते इतिहासात नोंदवले जाईल. त्याने आम्हाला कठीण परिस्थितीतही एकत्र आणले. तुमच्या योगदानाबद्दल आम्ही आमची कृतज्ञता शब्दांत पूर्णपणे व्यक्त करू शकतो. आमचे तुमच्यावर खूप प्रेम आहे. तुमच्या सत्याग्रहाबद्दल आम्ही तुमचे सदैव ऋणी राहू.



### भाजपा नेते मुरली मनोहर जोशी काय म्हणाले?

शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी शनिवारी (२५ जुलै) आपल्या पदाचा राजीनामा दिला. भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री डॉ. मुरली मनोहर जोशी यांनी प्रधान यांच्या निर्णयाचे स्वागत केले. त्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदनही केले.

उशिरा का होईना, पण योग्य वेळीच राजीनामा दिला आहे. अखेरीस, धर्में द्र प्रधान यांनी राजीनामा दिला आहे. मला आशा आहे की पंतप्रधानही यावर लवकरच योग्य वेळी निर्णय घेतील. ज्या विद्यार्थ्यांनी शांततेने आंदोलन संपवले, त्या सर्वांचे मी अभिनंदन करतो. मला आशा आहे की भारतीय शिक्षण व्यवस्थेत लवकरच शांतता प्रस्थापित होईल. त्याचबरोबर, विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल होते आणि त्यांच्या प्रगतीसाठी भरपूर संधी होत्या.

### हा नव्या पिढीचा मोठा विजय– अखिलेश यादव

समजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यावर मोठे वक्तव्य केले आहे. ''ही बातमी जिथे जिथे पोहोचली, तिथे लोकांनी आनंद साजरा केला आहे. हा अट्टाहास का? हा निर्णय आधीच घेता आला असता. परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याचे सरकारने स्वतःच मान्य केले आहे. तुम्ही कॅमेऱ्यासमोर बोललात, पण तुम्हाला तुमचा मोबाईल सरळ करून मध्यरात्री मेसेजही पाठवावा लागला, असे ते पत्रकारांना म्हणाले.

हा नव्या पिढीचा मोठा विजय आहे आणि सरकारने हे समजून घेतले पाहिजे की, शिक्षणाबद्दल सरकारने खूप गांभीर्याने विचार केला पाहिजे, तसेच प्रश्नपत्रिका फुटणार नाहीत याची खात्री करण्यासाठी ठोस पावले उचलली पाहिजेत. हा तरुणांचा मोठा विजय आहे.

यशाचं खरं श्रेय विद्यार्थ्यांनाच– अभिजीत दिपकेंचे वडील

आंदोलनाला अनेक नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि चित्रपटसृष्टीतील व्यक्तींनी पाठिंबा दिला. मात्र, या आंदोलनाचं खरे श्रेय केवळ विद्यार्थ्यांनाच दिले पाहिजे, असे भगवान दिपके यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले की, आंदोलनाच्या सुरुवातीच्या काळात सोनम वांगचुक अभिजीत दिपके यांच्यासोबत होते. त्यांनी सलग २६ दिवस उपोषण करून आंदोलनाला मोठं बळ दिलं. त्यांच्या त्यागामुळे आंदोलन अधिक मजबूत झाले. त्यांनी उपोषण सुरूच ठेवले असते, तर त्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला असता. त्यामुळे त्यांनी दिलेलं योगदानही या आंदोलनाच्या यशात महत्त्वाचं आहे.

याशिवाय विविध संघटना आणि आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्या सर्व घटकांच्या सहकार्यामुळेच आजचा दिवस पाहायला मिळाला आहे. या यशाचे श्रेय केवळ अभिजीतला नसून, विद्यार्थी, आंदोलनकर्ते आणि सर्व सहकाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे हे फलित आहे, असंही भगवान दिपके यांनी सांगितलं.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे वक्तव्य आणि राऊत यांचे सडेतोड उत्तर?

आज मुंबईत पत्रकारांशी बोलताना संजय राऊत यांनी निर्मला सीतारामन यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. राऊत म्हणाले की, अर्थमंत्र्यांना देशातील परिस्थिती आणि जमिनीवरील वास्तवाची काहीही समज नाही. त्यांना तरुणांच्या संघर्षाची कल्पना नाही. त्यांनी असेही म्हटले की, आम्ही त्यांच्या पतीशी (परकला प्रभाकर) बोलू, कारण ते एक हुशार व्यक्ती आहेत.

### पंतप्रधान मोदींनी माफी मागावी: राहुल गांधी

राहुल गांधी पुढे म्हणाले की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) शैक्षणिक संस्थांवर नियंत्रण असणे हा एक गंभीर मुद्दा आहे आणि यासाठी केवळ पंतप्रधानच नव्हे, तर आरएसएसदेखील तितकाच जबाबदार आहे. शिक्षण व्यवस्था आतून पूर्णपणे पोकळ झाली आहे आणि ती सुधारण्यासाठी कठोर व मूलभूत उपाययोजना करण्याची गरज आहे. त्यांनी असेही सांगितले की, लाठीचार्ज करणाऱ्या आणि आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवरील अत्याचारांविरोधात अधिकारी व आयोजकांवर कठोर आणि पारदर्शक कारवाई व्हावी, या विद्यार्थ्यांच्या दोन प्रमुख मागण्या आहेत. अखेरीस, त्यांनी मागणी केली की, या संपूर्ण संकटामागे आणि तरुणांच्या भविष्याशी खेळणारे मुख्य सूत्रधार म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील विद्यार्थ्यांची माफी मागावी. विद्यार्थ्यांवरील हिंसाचारासाठी अमित शाह जबाबदार असल्याचेही ते म्हणाले.

### सरन्यायाधीश शिष्टमंडळासोबतच्या चर्चेनंतर जेपी नड्डा काय म्हणाले?

कॉकरोच जनता पार्टीच्या शिष्टमंडळासोबतच्या चर्चेनंतर केंद्रीय मंत्री जेपी नड्डा म्हणाले, ''तुम्ही मला दिलेले पाच-कलमी सनद शिक्षण परीक्षांमधील सुधारणांशी संबंधित आहे. या संदर्भात, शिक्षण परीक्षांमधील सुधारणांसाठीच्या तुमच्या सनदेवर आम्ही गांभीर्याने विचार करू. मला वाटते की सरकारने त्यांच्या सर्व मागण्या सहानुभूतीपूर्वक विचारात घेतल्या आहेत आणि त्या स्वीकारल्या आहेत.''

### कॉकरोच जनता पार्टीने आंदोलन मागे घेतल्याची घोषणा केली

सरकारसोबत चर्चा झाल्यानंतर, कॉकरोच जनता पार्टीचे मुख्य प्रवक्ते सौरव दास म्हणाले, ''कॉकरोच जनता पार्टी जाहीर करतो की, आम्ही सद्भावनेने आमचे आंदोलन मागे घेत आहोत आणि मान्य केलेल्या अटींची अंमलबजावणी ठरलेल्या वेळेत केली जाईल, हे आम्ही गृहीत धरत आहोत.''

### अभिजित दिपके यांना टायफॉईड

कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजित दिपके यांना टायफॉईड झाल्याचं समोर आलं आहे. स्वत: दिपके यांनी सोशल मीडियावर व्हिडिओ पोस्ट करत आपल्याला टायफॉईड झाल्याची माहिती दिली आहे. नवी दिल्लीतील जंतरमंतर इथे गेल्या अनेक दिवसांपासून नीट पेपरफुटी प्रकरणी सीजेपीकडून आंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलनाला देशभरातून समर्थन मिळत आहे. मात्र अशात दिपके यांना टायफॉईडची लागण झाल्याने सीजेपीला मोठा झटका लागला. मात्र दिपकेंनी टायफॉईड झाल्यानंतरही आपली भूमिका ठाम ठेवली.

### आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर मंत्र्याचा राजीनामा; रिजिजूंकडून प्रधान यांच्या नेतृत्वाचे कौतुक

– परीक्षेच्या पेपरफुटीवरून देशभरात सुरू असलेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्में द्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी प्रधान यांच्या ''सार्वजनिक जीवन आणि विद्यार्थी कल्याणातील दीर्घकालीन योगदानाची'' दखल घेतली. एक्स () वरील एका पोस्टमध्ये रिजिजू यांनी प्रधान यांच्या कारकिर्दीचं वर्णन ''खऱ्या नेतृत्वाचं उदाहरण'' असं केलं आणि शैक्षणिक सुधारणा तसंच विद्यार्थ्यांच्या हितासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचं कौतुक केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लिहिलेल्या राजीनामा पत्रात प्रधान यांनी नमूद केलंय की, हे पद सोडणं ''विद्यार्थ्यांच्या व्यापक हितासाठी'' आहे आणि तरुणांना ''गोंधळाच्या जाळ्यात अडकण्यापासून'' वाचवण्यासाठी हे पाऊल उचललं आहे.

### आंदोलकांवर कोणतीही कारवाई नाही, नियमांनुसार नुकसानभरपाई दिली जाणार

कॉकरोच जनता पार्टीच्या शिष्टमंडळाशी चर्चा केल्यानंतर, केंद्रीय मंत्री जे.पी. नड्डा यांनी सांगितलं की, आंदोलकांच्या मागण्यांवर सरकारने सकारात्मक चर्चा केली आहे. ''आज आमची सविस्तर चर्चा झाली. त्यांनी एक लेखी मसुदा सादर केला, ज्यामध्ये आंदोलनादरम्यान दाखल असलेल्या खटल्यांबाबत चार मुद्दे मांडले होते. तसंच, सूडबुद्धीने कोणतीही कारवाई न करणे, नुकसानभरपाई आणि त्यांच्या पाच कलमी मागण्यांच्या पत्रावरही आम्ही चर्चा केली,'' असं नड्डा म्हणाले. नड्डा यांनी आश्वासन दिलं की, एफआयआरची () प्रत उपलब्ध करून दिली जाईल आणि आंदोलकांवर कोणतीही कारवाई केली जाणार नाही. ''नुकसानभरपाईबाबत सरकारने स्पष्ट केलं आहे की आमचीही त्याबाबत सहानुभूती आहे. नियमांनुसार नुकसानभरपाई दिली जाईल; त्यांना शक्य तितकी जास्तीत जास्त मदत दिली जाईल, असंही नमूद केलं.

### पोरांनी मोदी सरकारला झुकवलं, शिक्षणमंत्र्यांच्या राजीनामन्यानंतर २ प्रमुख मागण्या मान्य, आंदोलन मागे

आंदोलक विद्यार्थ्यांच्या मागणीला मोठं यश आलं आहे. केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यानंतर आंदोलकांच्या आणखी २ प्रमुख मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत. आंदोलक विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेण्यासह आत्महत्या केलेल्यांच्या कुटुंबियांना १ कोटी रुपये मदत देण्याची मागणी सरकारककडून मान्य करण्यात आली. त्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आल्याचं सीजेपीच्या प्रवक्त्यांकडून पत्रकार परिषदेतून जाहीर करण्यात आलं.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# पंढरपूर कॉरिडॉरचे काम कोणावरही अन्याय न करता योग्य पुनर्वसन करून पूर्ण करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्र्यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा

**पंढरपूर । प्रतिनिधी :** श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी दरवर्षी वाढणारी भक्तांची गर्दी पाहता त्यांना उत्तम सोयी उपलब्ध करून देण्यासाठी मंदिर परिसर विकासाचे काम पंढरपूर कॉरिडॉरच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. कोणावरही अन्याय न करता सर्वांचे योग्य पुनर्वसन करून हे काम येत्या अडीच वर्षांत पूर्ण करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

आषाढी शुद्ध एकादशी निमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री फडणवीस यांनी सपत्नीक तसेच मानाचे वारकरी बाबासाहेब माधव माने, प्रभावती बाबासाहेब माने या दाम्पत्यासमवेत केली. त्यानंतर श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने झालेल्या सत्कारप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.



यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, अमृता फडणवीस, आमदार समाधान आवताडे, राजेंद्र राऊत, सुरेश खाडे, बापूसाहेब पठारे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते.

मागील काळात सुरू केलेले मंदिर विकासाचे काम बहुतांश पूर्ण झाले असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी लाखो लोक येतात. येथे अत्यंत कमी जागा आहे. आता मोठी जागा तयार करणे गरजेचे आहे. यावर्षी हे काम सुरू करायचे आहे. कॉरिडॉर विकासात येथील व्यावसायिकांचा व्यवसाय वाढेल, नागरिकांना घरे मिळतील, भाडेकरूंची व्यवस्था होईल, अशा पद्धतीने त्याची रचना करण्यात आली आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर कितीही भाविक आले तरी अतिशय उत्तम व्यवस्था या ठिकाणी होईल.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, यावेळी वारीने एक नवा उच्चांक गाठला आहे. यावर्षी २५ किलोमीटरपेक्षा जास्त लांबीची दर्शनासाठी रांग लागली होती. परंतु दर्शनासाठी २५ तास लागले तरीही कोणीही नाराज न होता, न थकता त्या ठिकाणी आनंदाने विठ्ठल नामाचा गजर करत हे दर्शन घेत आहेत. चंद्रभागेचे पाणी स्वच्छ राहील याची काळजी घेण्यात आली आहे. यावेळी पालकमंत्र्यांनी वाळवंटात अतिशय सुंदर व्यवस्था केल्यामुळे तिथला कचरा, विष्ठा आदी संपूर्ण स्वच्छता झाली आहे. त्यामुळे अतिशय सुंदर वाळवंट आपल्याला पुन्हा एकदा पाहायला मिळत आहे. आपण सर्वजण करत असलेली सेवा श्री विठ्ठल स्वीकारतील आणि त्यांचा आशीर्वाद आपल्या सर्वांना सदैव मिळेल, अशी प्रार्थना मी त्यांच्या चरणी करतो.

लाखो भक्त विठुरायाच्या दर्शनासाठी पायी निघतात. अनेक वारकरी कळसाच्या दर्शनावरच समाधान मानतात. जणू काही विठुरायाचीच भेट झाली आहे, अशा भावनेने लोक जातात. या अनोख्या सोहळ्यात सहभागी होण्याची संधी मिळणे, ही देखील एक पर्वणी आहे. महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीने आपला प्रतिनिधी म्हणून केलेली ही पूजा संपूर्ण महाराष्ट्रातील आणि जगभरातील पांडुरंगाच्या भक्तांच्या वतीने केलेली पूजा आहे, असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, येणारा वारकरी हा शेतकरी, शेतमजूर, बारा बलुतेदार, उद्योजक अशा सर्व क्षेत्रातील आहे. विठुरायाची सेवा जरी आपल्याला करता आली नाही, तरी वारकऱ्यांची, शेतकऱ्यांची सेवा केली तरी ती सेवा विठुरायापर्यंत पोहोचते. त्यामुळे यावर्षी शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडावे, यासाठी ५६ लाख शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय आणि थकीत वीजबिले माफ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

प्रारंभी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी प्रास्ताविक केले. श्री विठ्ठल मंदिराला पाठबळ देणे, निधी देणे आणि विकास करण्याचे काम मुख्यमंत्र्यांनी केले आहे. आज विठुमाऊलीच्या दर्शनासाठीच्या रांगेचे अत्यंत चांगल्या प्रकारे व्यवस्थापन केले आहे. दर्शन रांगेत ५० ते ६० हजार वारकरी असले तरी पालकमंत्र्यांनी राज्य शासन आणि प्रशासनाच्या माध्यमातून अत्यंत चांगल्या सुविधा केल्यामुळे दर्शन सुसह्य झाले आहे, असे ते म्हणाले.

शासकीय महापूजेचे मानाचे वारकरी मु.पो. गौरगाव, ता. कळंब, जि. धाराशिव येथील बाबासाहेब माधव माने आणि सौ. प्रभावती माने या दाम्पत्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अमृता फडणवीस यांच्या हस्ते महापूजेनंतर सन्मान करण्यात आला. तसेच एसटी महामंडळाकडून त्यांना वर्षभर मोफत एसटी प्रवास पास वितरित करण्यात आला.

**मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'श्री विठ्ठल निर्मल दिंडी' पुरस्कार वितरण**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पाणी, स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, प्लास्टिकमुक्त वारी, वृक्षसंवर्धन आदी विषयांवर प्रबोधन करणाऱ्या दिंड्यांना 'श्री विठ्ठल निर्मल दिंडी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये प्रथम क्रमांक श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थान, कौंडण्यपूर, द्वितीय क्रमांक वारकरी धर्मसंकीर्तन सेवा प्रतिष्ठान, जालना आणि तृतीय क्रमांक गोऱ्हेकर संस्था, आळंदी देवाची यांना पुरस्कार व धनादेश देण्यात आला.

## महत्त्वाचे...

### नागरिकांसाठी सावधगिरीचा इशारा: बनावट 'एयर सुविधा २.०' संकेतस्थळापासून सावध रहा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाच्या निदर्शनास आले आहे की काही बनावट संकेतस्थळे आणि पोर्टल्स 'एअर सुविधा २.०'ची नक्कल करून प्रवाशांची दिशाभूल करत आहेत. तसेच, त्यांना पैसे भरण्याच्या बनावट पृष्ठावर पाठवून आर्थिक फसवणुकीचा प्रयत्न केला जात आहे.

प्रवाशांना सूचित करण्यात येते की 'एयर सुविधा २.०' च्या सेवा पूर्णपणे मोफत पुरविल्या जातात आणि स्व-घोषणापत्र सादर करण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही. 'एयर सुविधा २.०' चे एकमेव अधिकृत पोर्टल पुढीलप्रमाणे आहे: https://airsuvidha.civilaviation.gov.in/ प्रवाशांना विनंती करण्यात येते की कोणतीही वैयक्तिक किंवा प्रवासाशी संबंधित माहिती देण्यापूर्वी संकेतस्थळाचे यूआरएल काळजीपूर्वक तपासावे आणि 'एयर सुविधा २.०' सेवा देण्याचा दावा करणाऱ्या कोणत्याही अनाधिकृत संकेतस्थळावर पैसे भरणे टाळावे.

प्रवाशांनी केवळ अधिकृत पोर्टलचाच वापर करावा आणि अधिकृत माहितीसाठी सरकारच्या अधिकृत निवेदनांवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

### जगातील सर्वात मोठ्या तेल कंपनीवर मिसाइल आणि ड्रोन हल्ला; अमेरिकेची एअर डिफेन्स सिस्टिम अपयशी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर एक अत्यंत मोठी आणि चिंताजनक बातमी समोर आली आहे. जगातील सर्वात मोठी तेल कंपनी असलेल्या 'अरामको' वर भीषण मिसाइल आणि ड्रोन हल्ला झाला आहे. विशेष म्हणजे, या हल्ल्यांना रोखण्यात अमेरिकेची अत्याधुनिक एअर डिफेन्स सिस्टिम पूर्णपणे अपयशी ठरली आहे, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर खळबळ उडाली आहे.

सौदी अरेबिया आज सकाळी सलग झालेल्या मिसाइल आणि ड्रोन हल्ल्यांमुळे हादरून गेला. या हल्ल्यामध्ये सौदीच्या जिजान औद्योगिक शहरात जोरदार स्फोटाचे आवाज ऐकू आले. जिजानमधील सौदीच्या एका अत्यंत महत्त्वाच्या केंद्राला मिसाइल हल्ल्यामध्ये थेट टार्गेट करण्यात आले. या हल्ल्यामुळे जगातील सर्वात मोठ्या तेल कंपनीच्या सुविधांना मोठा धोका निर्माण झाला आहे. हल्ल्यानंतर सुरक्षिततेचा उपाय म्हणून अनेक भागांमधील वीज पुरवठा तात्काळ खंडित करण्यात आला आहे.

प्राथमिक माहितीनुसार, हा हल्ला येमेनमधून करण्यात आला असून, अरामकोशी संबंधित तेल सुविधा केंद्रांना विशेष लक्ष करण्यात आले आहे. येमेनमधून सौदी अरेबियाच्या जिजान, यानबू आणि दमाद या भागांवर मिसाइल आणि ड्रोनचा मारा करण्यात आला. या गंभीर परिस्थितीची दखल घेत सौदी सिविल डिफेन्स फोर्सने यानबू प्रांतासाठी तातडीने आपत्कालीन अलर्ट जारी केला आहे. अरामको ही जगातील ऊर्जा क्षेत्रातील सर्वात मोठी कंपनी असल्याने, या हल्ल्यात नेमके किती नुकसान झाले आहे, याबाबत अद्याप अधिकृत आकडेवारी समोर आलेली नाही.

# मुस्लिमांना अनुसूचित जातीचा दर्जा देण्याची मागणी हायकोर्टाने फेटाळली; २७ वर्षानंतर याचिका निकाली

**नागपूर । प्रतिनिधी :** इस्लाम धर्माचे पालन करणाऱ्या व्यक्तींना अनुसूचित जातीचा दर्जा नाकारणाऱ्या 'संविधान (अनुसूचित जाती) आदेश, १९५०'मधील तरतुदीच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणारी तब्बल २७ वर्षापासून प्रलंबित याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने फेटाळली. या तरतुदीची वैधता सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच कायम ठेवली असून तो निर्णय उच्च न्यायालयावर बंधनकारक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फलके आणि न्यायमूर्ती निवेदिता पी. मेहता यांच्या खंडपीठाने शुक्रवारी हा निर्णय दिला. मोहम्मद फहीम शेख इब्राहिम कुरेशी यांनी १९९९ मध्ये ही याचिका दाखल केली होती. त्यांनी 'बहना' अनुसूचित जातीचे असल्याचा दावा केला होता. मात्र, ते जन्माने मुस्लिम असून त्यांच्या शालेय नोंदीत 'मुस्लिम-बहना' अशी नोंद असल्याचे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने नमूद केले होते. त्यांचा अनुसूचित जातीचा दावा समितीने २४ नोव्हेंबर १९९८ रोजी अवैध ठरविला होता.



**हिंदू, शीख आणि बौद्ध धर्मीयांपुरती तरतूद**

याचिकाकर्त्याने जात पडताळणी समितीच्या निर्णयासह 'संविधान (अनुसूचित जाती) आदेश, १९५०'मधील परिच्छेद ३ च्या घटनात्मक वैधतेलाही आव्हान दिले होते. या तरतुदीनुसार हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माव्यतिरिक्त अन्य धर्माचे पालन करणाऱ्या व्यक्तीला अनुसूचित जातीचा सदस्य मानता येत नाही. त्यामुळे मुस्लिमांना या दर्जापासून वंचित ठेवणे हे संविधानातील अनुच्छेद १४, १५, १६ आणि २५ चे उल्लंघन असल्याचा दावा करण्यात आला होता.

मात्र, सर्वोच्च न्यायालयाने 'सूसाई विरुद्ध भारत सरकार' या प्रकरणात १९८५ मध्ये या तरतुदीची घटनात्मक वैधता कायम ठेवली आहे. सर्वोच्च न्यायालयाने घोषित केलेला कायदा संविधानाच्या अनुच्छेद १४१ नुसार देशातील सर्व न्यायालयांवर बंधनकारक आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय पुनर्विचारात बदलला किंवा रद्द केला जात नाही, तोपर्यंत उच्च न्यायालयाला त्यापेक्षा वेगळी भूमिका घेता येणार नाही, असे खंडपीठाने स्पष्ट केले.

**सर्वोच्च न्यायालयात मुद्दा प्रलंबित**

मुस्लिम आणि ख्रिश्चनांना अनुसूचित जातीच्या लाभातून वगळण्याच्या घटनात्मक वैधतेशी संबंधित व्यापक मुद्दा सध्या सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामुळे नागपूर खंडपीठातील ही याचिकाही अनेक वर्षे प्रलंबित ठेवण्यात आली होती. मात्र, केवळ सर्वोच्च न्यायालयात तत्सम प्रकरण प्रलंबित आहे म्हणून सध्या अस्तित्वात असलेल्या बंधनकारक न्यायनिर्णयाकडे दुर्लक्ष करता येणार नाही, असे उच्च न्यायालयाने नमूद केले.

याचिकाकर्त्याने हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात वर्ग करण्यासाठीही अर्ज केला होता. सर्वोच्च न्यायालयाने २० मे २०२६ रोजी तो अर्ज फेटाळून नागपूर खंडपीठाला याचिका प्राधान्याने घेऊन चार महिन्यांत निकाली काढण्याचा प्रयत्न करण्याचे निर्देश दिले होते. सर्वोच्च न्यायालयाने त्या वेळी प्रकरणाच्या गुणवत्तेवर कोणतेही मत व्यक्त केले नव्हते.

**भविष्यात दिलासा मिळण्याचा मार्ग खुला**

खंडपीठाने अखेर १९५०च्या आदेशातील परिच्छेद ३ च्या घटनात्मक वैधतेवरील आव्हान फेटाळले. तसेच, याचिकाकर्त्याचा 'बहना' अनुसूचित जातीचा दावा अवैध ठरविणाऱ्या नागपूर जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या १९९८ मधील निर्णयात हस्तक्षेप करण्यास नकार दिला.

मात्र, सर्वोच्च न्यायालयाने सध्या प्रलंबित प्रकरणात भविष्यात विद्यमान कायदेशीर स्थितीपेक्षा वेगळा निर्णय दिल्यास याचिकाकर्त्याला त्यानुसार योग्य दिलासा आणि परिणामी लाभ मागण्याचा मार्ग खुला राहील, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. त्यानंतर याचिका फेटाळण्यात आली.

# मुंबईच्या शेजारील जिल्ह्यात भूकंप, ३.१ रिश्टर स्केलने हादरला परिसर, लोकांमध्ये भीतीचं वातावरण

**दैनिक आपला विदर्भ**

**पालघर । प्रतिनिधी :** देशाची आर्थिक राजधानी मुंबईपासून काही अंतरावर असलेल्या पालघर जिल्ह्यात भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. ३.१ रिश्टर स्केलच्या तीव्रतेनं जमीन हादरली आहे. विशेष म्हणजे या परिसरात भूकंप येण्याची ही पहिलीच वेळ नाही. या पूर्वी देखील या परिसरात भूकंपाचे धक्के जाणवले आहेत.

मागील काही दिवसांपासून पालघर जिल्ह्यात भूकंपाचे धक्के जाणवत आहेत. आज पुन्हा एकदा जिल्हा भूकंपाच्या धक्क्याने हादरला आहे. जिल्ह्यातील कासा आणि धुंदलवाडी परिसरामध्ये आज सकाळी १० वाजून ५८ मिनिटांच्या सुमारास भूकंपाचा सौम्य धक्का जाणवला. वारंवार बसणाऱ्या या धक्क्यांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये पुन्हा एकदा भीतीचं आणि चिंतेचं वातावरण पसरलं आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, या भूकंपाची तीव्रता ३.१ रिश्टर स्केल इतकी नोंदवली गेली आहे. या भूकंपाचा केंद्रबिंदू जमिनीखाली अवघ्या ४ किलोमीटर अंतरावर असल्याने कासा, धुंदलवाडी आणि लगतच्या ग्रामीण भागातील नागरिकांना जमिनीच्या कंपनाचे स्पष्ट हादरे जाणवले. हादरा जाणवताच घाबरलेले नागरिक घराबाहेर सुरक्षित स्थळी धावले.

पालघर जिल्ह्यातील डहाणू आणि तलासरी तालुक्यातील कासा-धुंदलवाडी पट्टा हा गेल्या काही वर्षांपासून अत्यंत संवेदनशील बनला आहे. या भागात सातत्याने लहान-मोठ्या तीव्रतेच्या भूकंपाचे धक्के बसत असतात.

आज बसलेल्या ३.१ रिश्टर स्केलच्या धक्क्यामुळे सुदैवाने कुठेही जीवित किंवा मोठ्या मालमत्तेच्या नुकसानीचे वृत्त नाही. मात्र, पालघर जिल्ह्यात २०१८ पासून भूकंपाच्या धक्क्यांचं सत्र सुरूच असून आतापर्यंत तब्बल अडीच हजारांहून अधिक कमी जास्त तीव्रतेचे भूकंपाचे हादरे या परिसरात बसले आहेत . सतत सुरू असलेल्या या भूकंपाच्या धक्क्यांमध्ये कोणतीही मोठी जीवितहानी झाली नसली तरी सुद्धा ग्रामीण भागातील घरांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याच समोर आला आहे .

### आसाममधील पूरपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अभिनेत्री पेडणेकरनं मदतीचं केलं आवाहन

हैदराबाद : हिंदी चित्रपटसृष्टीची अभिनेत्री भूमी पेडणेकरनं देशभरातील लोकांना आसाममधील विनाशकारी पुराचा फटका बसलेल्यांना मदत करण्यासाठी पुढं येण्याचं आवाहन केलं आहे. २४ जुलै रोजी आसाममधील परिस्थिती गंभीर होती. ११ जिल्ह्यांमधील ७.२१ लाखांहून अधिक लोक या पुरामुळं बाधित झाले आहेत. अहवालांनुसार, पाच प्रमुख नद्या धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत. या आपत्तीची तीव्रता अधोरेखित करताना, भूमीनं इन्स्टाग्रामवरील एका व्हिडिओमध्ये सांगितलं की, लाखो लोक विस्थापित झाले आहेत,अनेकांचे प्राण गेले आहेत आणि संपूर्ण गावे वाहून गेली आहेत.

व्हिडिओमध्ये ती म्हणाली, नमस्कार, देशात सध्या जे काही घडत आहे, त्याबद्दल आपल्या सर्वांनाच माहिती आहे. आणि त्या उत्साहाला मी सलाम करते. पण देशाचा एक भाग असा आहे, ज्याला आपली खूप गरज आहे, आणि तो म्हणजे आसाम. आसाममध्ये भीषण पूर आला आहे. परिस्थिती इतकी गंभीर आहे की ७.५ लाख लोकांना सुरक्षित स्थळी हलवावे लागले आहे.

# राज्यात पुढील दोन ते तीन दिवस मुसळधार पावसाचा इशारा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यात पुढील दोन ते तीन दिवस पावसाचा जोर कायम राहणार असल्याचा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला असून अनेक भागांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. मान्सूनची प्रणाली अधिक सक्रिय झाल्यामुळे तसेच गुजरातपासून कर्नाटकपर्यंत कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने त्याचा परिणाम महाराष्ट्रातील बहुतांश भागांवर होत असल्याचे हवामान तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

विशेषत: पुणे आणि सातारा जिल्ह्यातील घाटमाथा परिसरात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला असून मुंबई, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि कोल्हापूर घाटमाथा परिसरासाठी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. उत्तर कोकणात काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार, तर काही भागांत अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. दक्षिण कोकण, गोवा आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रातील घाट क्षेत्रांमध्येही जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

दरम्यान, गोंदिया जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून झालेल्या समाधानकारक पावसामुळे खरीप हंगामातील शेती कामांना वेग आला आहे. धान उत्पादक जिल्हा म्हणून ओळख असलेल्या गोंदियामध्ये धान लागवडीची कामे वेगाने सुरू असून शेतकरी सकाळपासून संध्याकाळपर्यंत शेतात मेहनत घेत आहेत. धान लागवडीसाठी महिला मजुरांची मोठ्या प्रमाणावर गरज निर्माण झाल्याने ग्रामीण भागात स्थानिक स्तरावर रोजगाराच्या संधीही उपलब्ध झाल्या आहेत.

याउलट अकोला जिल्ह्यात अद्यापही समाधानकारक पाऊस झालेला नाही. जिल्ह्यात सरासरीच्या केवळ ७८ टक्के पावसाची नोंद झाली असून जवळपास ५० हजार हेक्टर क्षेत्रावरील खरीप पेरणी अद्याप बाकी आहे. पावसाची २२ टक्के तूट असल्याने धरणांमधील पाणीसाठाही अपेक्षेपेक्षा कमी आहे. अकोला शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या काटेपूर्णा प्रकल्पात केवळ २० टक्के पाणीसाठा उपलब्ध असल्याने चिंता वाढली आहे. उशिरा पेरणी करणाऱ्या शेतकऱ्यांनी कृषी विद्यापीठाच्या मार्गदर्शनानुसार अल्पकालीन पिकांची निवड करावी, असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे.

अल्प कालावधीत अनेक ठिकाणी अतिवृष्टीची नोंद होत असल्याबाबत



भारतीय हवामान विभागाच्या अधिकाऱ्यांनी वातावरणातील बदल, मान्सूनच्या प्रणालीतील चढ-उतार, एल निनो आणि ला निना यांसारख्या हवामान घटकांचा प्रभाव तसेच वाढते प्रदूषण ही प्रमुख कारणे असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे नागरिकांनी हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करत आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# विद्यार्थी शक्तीचा विजय! जंतर-मंतरवर आमदार सिद्धार्थ खरातांनी अभिजीत दिपके यांचे अभिनंदन

## विद्यार्थ्यांच्या संघर्षाला खंबीर साथ; धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामा









दैनिक आपला विदर्भ

**मेहकर । प्रतिनिधी** : दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला मेहकर विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार सिद्धार्थ खरात यांनी भेट देत आंदोलनकर्त्यांना जाहीर पाठिंबा दिला.

आंदोलनाचे प्रमुख नेतृत्व करणारे अभिजीत दिपके, आशुतोष राणा आणि सौरभ दास यांची त्यांनी भेट घेऊन विद्यार्थ्यांच्या लढ्याचे कौतुक केले.

यावेळी शिवसेना उ.बा.ठा. तालुकाप्रमुख निंबाजी पांडव, युवासेना तालुकाप्रमुख अँड आकाश घोडे तसेच डॉ. सार्थ सिध्दार्थ खरात हे उपस्थित होते. सर्वांनी आंदोलनकर्त्यांशी संवाद साधत विद्यार्थ्यांच्या न्यायाच्या लढ्यात खंबीरपणे सोबत असल्याचा विश्वास व्यक्त केला.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्याची बातमी समोर आल्यानंतर आमदार सिद्धार्थ खरात यांनी आंदोलनाचे प्रमुख अभिजीत दिपके त्यांची भेट घेऊन अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या एकजुटीमुळे आणि लोकशक्तीमुळे हा लढा निर्णायक टप्प्यावर पोहोचल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले, विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सुरू असलेल्या या संघर्षात आम्ही कायम त्यांच्या पाठीशी आहोत. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर शासनाने संवेदनशील भूमिका घेणे आवश्यक आहे. जंतर-मंतरवरील या भेटीमुळे आंदोलनकर्त्यांचे मनोबल उंचावले असून, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर लोकप्रतिनिधींनी घेतलेल्या पुढाकाराचे आंदोलनकर्त्यांनी स्वागत केले.

## वृत्तविशेष...

### जंतर-मंतर आंदोलनाच्या यशानंतर चंद्रपुरात विद्यार्थ्यांचा जल्लोष



दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपुर । प्रतिनिधी :** जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांनी विविध शैक्षणिक मागण्यांसाठी केलेल्या आंदोलनाला यश मिळाल्याची भावना व्यक्त करत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर चंद्रपुरातील विद्यार्थ्यांनी प्रियदर्शनी चौकात जल्लोष साजरा केला. यावेळी विद्यार्थ्यांनी घोषणाबाजी करत आंदोलनातील सहभागी विद्यार्थ्यांच्या संघर्षाला सलाम केला. हा विद्यार्थ्यांच्या संघर्षाचा, एकतेचा आणि सातत्यपूर्ण लढ्याचा विजय असल्याची प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. जंतर-मंतरवरील आंदोलनामुळे देशभरातील विद्यार्थ्यांची ताकद समोर आल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी यावेळी केला.

### बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन छाननीचे ठिकाण बदलले

**बुलढाणा । प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, बुलढाणा यांच्या मंजूर निवडणूक कार्यक्रमानुसार प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छानणी सोमवार, दि. २७ जुलै २०२६ रोजी होणार आहे. या छानणीसाठी पूर्वी निश्चित करण्यात आलेल्या ठिकाणी जागेची अपुरी उपलब्धता व गैरसोय होण्याची शक्यता लक्षात घेऊन छानणीच्या ठिकाणात बदल करण्यात आला आहे.

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांच्या मान्यतेनंतर आता नामनिर्देशन पत्रांची छानणी सहकार विद्या मंदिर शाळेचे सभागृह, चिखली रोड, बुलढाणा येथे करण्यात येणार आहे. याबाबत सर्व संबंधित उमेदवार, प्रतिनिधी व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### नीट पेपर फुटी नंतर २१ विद्यार्थ्यांनी जीव गमावलेल्या विद्यार्थ्यांना वाहिली श्रद्धांजली



**अमरावती । प्रतिनिधी :** केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर देशभरात विविध प्रतिक्रिया उमटत असताना अमरावतीत काँग्रेसतर्फे कॅण्डल मार्च काढण्यात आला. शहरातील राजकमल चौकातून काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी हाती मेणबत्त्या घेऊन जयस्तंभ चौकापर्यंत मार्च काढला. जयस्तंभ चौकातील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून नीट पेपरफुटी प्रकरणानंतर मृत्यू झाल्याचा दावा करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष बबलू शेखावत यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी भीतीपोटी राजीनामा दिल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.

### आषाढी एकादशीला विठुरायाच्या पंढरीत अनर्थ घडला, वारीच्या बंदोबस्तासाठी आलेल्या जवानाने स्वत:वर गोळ्या झाडत आयुष्य संपवलं

**पंढरपूर । प्रतिनिधी** : आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर संपूर्ण पंढरपूर विठ्ठलमय झाले असतानाच एक अत्यंत धक्कादायक आणि दुर्दैवी घटना समोर आली आहे. वारीसाठी आलेल्या लाखो वारकरी आणि भाविकांच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या राज्य राखीव पोलीस दलातील एका जवानाने स्वत:वर बंदुकीने गोळ्या झाडून आपले जीवन संपवले आहे. या घटनेमुळे पंढरपूरसह पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे.

रामेश्वर ध्रुपद साबणे असे जीवन संपवणाऱ्या ३० वर्षीय एसआरपीएफ जवानाचे नाव असून ते मूळचे परभणी जिल्ह्यातील गंगाखेड येथील रहिवासी होते. आषाढी एकादशीच्या दिवशी पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास, ज्या वेळी श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा सुरू होती, त्याच सुमारास रामेश्वर यांनी स्वत:च्या सर्व्हिस रायफलमधून गोळ्या झाडून हे टोकाचे पाऊल उचलले. गोळीबाराचा आवाज होताच परिसरात तैनात असलेल्या इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. मात्र, गंभीर दुखापत झाल्याने रामेश्वर साबणे यांचा जागीच मृत्यू झाला होता. त्यांनी ऐन आषाढी एकादशीच्या दिवशी हे टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप समोर आलेले नाही. या प्रकरणाचा पोलीस पुढील तपास करत आहेत.

# शिर्डीत आषाढी एकादशीचा उत्सव; १६ टन साबुदाणा खिचडीचा प्रसाद

**शिर्डी । प्रतिनिधी** : पंढरपूरमध्ये आषाढी एकादशीचा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सपत्नीक श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेची शासकीय महापूजा केली. तसेच शिर्डी साईबाबा मंदिरात देखील साईबाबा संस्थानच्यावतीनं आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

साईबाबांना विठ्ठलस्वरूप मानणाऱ्या भाविकांनी आज शिर्डीत दर्शनासाठी अलोट गर्दी केली. साई दर्शनासाठी आलेल्या भाविकांना साईबाबा संस्थानच्या वतीनं तब्बल १६ टन साबुदाणा खिचडीचा प्रसाद बनवण्यात आला आहे. दिवसभरात ९० हजार भाविक या खिचडी प्रसादाचा लाभ घेतील असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

साईबाबा हयात असताना साईबाबांचे परमभक्त दासगणू महाराज हे आषाढीच्या वारीला दरवर्षी पंढरपूरला विठ्ठलदर्शनासाठी जात होते. दासगणूंची एक आषाढी वारी चुकली आणि विठ्ठलदर्शनासाठी आतुर झालेल्या दासगणूंना साईबाबांनी विठ्ठलाच्या रूपात दर्शन दिलं. तेव्हा साक्षात विठ्ठल समोर पाहून दासगणू महाराजांनी 'शिर्डी माझे पंढरपूर' अशी काव्यरचना केली.

आजही साईमंदिरात बाबांच्या मंगलस्नानानंतर ही आरती म्हटली जाते. असंख्य भाविक साईबाबांनाच विठ्ठलस्वरूप मानून दर आषाढीला साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत येतात आणि विठ्ठलरूपी साईंचं दर्शन घेऊन धन्य होतात.

९० हजारांहून अधिक भाविक घेणार प्रसादाचा लाभ : शिर्डीला येणाऱ्या भाविकांना आषाढी एकादशीनिमित्त असलेला उपवासाचा दिवस लक्षात घेऊन साई संस्थानच्या प्रसादालयात आज भाविकांना साबुदाणा खिचडी आणि झिरकेचा प्रसाद दिला जात आहे. यंदा ९० हजार भाविकांसाठी १६ टन साबुदाणा खिचडी तयार करण्याचं नियोजन संस्थाननं केलं आहे. आज साई प्रसादालयात ६००० किलो साबुदाणा, ४५०० किलो शेंगदाणे, ३५०० किलो बटाटे, ११०० किलो शेंगदाणा तेल, ३५० किलो मिरची, ३०० किलो मीठ तसेच ४०० किलो साखरेचा वापर करून हा प्रसाद तयार करण्यात आला आहे. आज दिवसभर साबुदाण्याची खिचडी आणि शेंगदाण्याचे झिरके हेच जेवण म्हणून भाविकांना दिलं जाणार आहे.

# विठ्ठल चरणी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचे साकडे; सर्वांना निरोगी आयुष्य, बळीराजाला भरघोस पाऊस लाभू दे

## सलग ४३व्या वर्षी आषाढी वारीत सहभाग; पांडुरंगाचे घेतले मनोभावे दर्शन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :**आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार) तसेच आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे श्री विठ्ठल-रुक्मिणीचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी विठ्ठल चरणी नतमस्तक होत देशातील प्रत्येक नागरिकाला निरोगी व आरोग्यदायी आयुष्य लाभावे, तसेच अन्नदाता बळीराजासाठी भरघोस पाऊस पडून समृद्धी यावी, असे साकडे घातले.




आषाढी एकादशी निमित्त राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी आणि भाविक पंढरपूरमध्ये दाखल झाले होते. सुंदर ते ध्यान उभे विटेवरी... या भक्तिरसात रंगलेल्या वातावरणात प्रतापराव जाधव यांनी विठ्ठलाचे दर्शन घेत देशाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली.

यावेळी त्यांनी, प्रत्येक नागरिक उत्तम आरोग्य लाभून निरोगी जीवन जगावा आणि शेतकऱ्यांच्या श्रमाला यश मिळण्यासाठी वेळेवर व समाधानकारक पाऊस व्हावा, अशी प्रार्थना विठ्ठल चरणी अर्पण केली. सलग ४३वी आषाढी वारी बुलढाणा जिल्ह्याचे खासदार तथा केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे विठ्ठलाचे निस्सीम भक्त म्हणून ओळखले जातात. कोरोनाच्या दोन वर्षांचा अपवाद वगळता त्यांनी सलग ४३ वर्षे आषाढी वारीत सहभाग नोंदविला आहे. यंदाही त्यांनी विठ्ठल चरणी नतमस्तक होत देशातील जनतेच्या उत्तम आरोग्यासाठी, समाजाच्या कल्याणासाठी आणि बळीराजाच्या समृद्धीसाठी प्रार्थना केली.

## पालकमंत्री मकरंद जाधव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली

# कर्जमुक्ती योजनेची वेगवान अंमलबजावणी

- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६
- बुलढाणा जिल्ह्यातील १०,४६७ पात्र शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध
- आधार प्रमाणीकरण तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील १० हजार ४६७ पात्र शेतकऱ्यांच्या याद्या गावपातळीवर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. पालकमंत्री तथा मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शासनाच्या आदेशानुसार योजनेची अंमलबजावणी वेगाने व प्रभावीपणे करण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे.

पात्र लाभार्थी शेतकऱ्यांनी विलंब न करता आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण करून शासनाच्या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हास्तरीय कर्जमुक्ती समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी केले आहे.

योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांच्या याद्या संबंधित गावांच्या ग्रामपंचायत कार्यालय, ग्रामसेवा सहकारी संस्था, तलाठी कार्यालय, सहकारी बँकेच्या शाखा तसेच सहाय्यक निबंधक कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. लाभार्थ्यांनी या याद्यांमध्ये आपले नाव तपासून फार्म आयडी व आधार कार्डासह जवळच्या ई-सेवा केंद्रावर जाऊन आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे.

ज्या शेतकऱ्यांचे आधार क्रमांक आणि बँक खाते परस्पर लिंक झालेले नाही, त्यांनी संबंधित बँक अथवा संस्थेशी संपर्क साधून ती प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. आधार प्रमाणीकरण पूर्ण केल्याशिवाय कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळणार नाही, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

योजनेच्या अंमलबजावणीदरम्यान काही अडचणी अथवा तक्रारी असल्यास संबंधित तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीकडे दाद मागता येणार आहे. शासनाने निश्चित केलेल्या मुदतीत सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र शेतकऱ्यांना योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकरी बांधवांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून आधार प्रमाणीकरण तातडीने पूर्ण करावे आणि शासनाच्या कर्जमुक्ती योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी केले आहे.

# ९१३ लाभार्थ्यांना ९.१३ कोटी रुपयांच्या कर्जास मंजुरी

## प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेअंतर्गत विशेष शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय (एमएसएमई) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेच्या विशेष शिबिरास जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात १ हजार २४५ लाभार्थींनी सहभाग नोंदविला. यापैकी ९१३ लाभार्थ्यांच्या कर्जप्रकरणांना मंजुरी देण्यात आली असून त्यासाठी ९ कोटी १३ लाख रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले.

जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण कुमार देवरे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित या






शिबिरास सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे मुख्य महाव्यवस्थापक सोहेल अहमद, स्टेट बँक ऑफ इंडियाचे प्रादेशिक व्यवस्थापक नीरज कुमार, एमएसएमई, नागपूरचे सहाय्यक संचालक मधुकर, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे प्रादेशिक प्रमुख पंकज कुमार, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे, विविध बँकांचे जिल्हास्तरीय अधिकारी तसेच संबंधित समितीचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेचा लाभ अधिकाधिक पात्र पारंपरिक कारागीर, हस्तकला व्यावसायिक व सेवा क्षेत्रातील लाभार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. लाभार्थ्यांना कर्जप्रकरणे, बँकिंग सुविधा तसेच योजनेअंतर्गत उपलब्ध असलेल्या विविध लाभांची माहिती देण्यात आली.

प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना ही पारंपरिक कारागीर व कौशल्याधारित व्यवसाय करणाऱ्या घटकांना आर्थिक सहाय्य, कौशल्यविकास, आधुनिक साधनसामग्री आणि बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाची महत्त्वपूर्ण योजना असून, अशा विशेष शिबिरांमुळे लाभार्थ्यांना थेट लाभ मिळत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.